**L. A. BILL No. IX OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE PANDHARPUR TEMPLES ACT, 1973.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.**

**पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७४ चा महा. ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, पंढरपूर मंदिरे (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३२अ ची सुधारणा.

**२.** पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ याच्या कलम ३२अ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९७४ चा महा. ९.

" (५) सल्लागार परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी हा, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीवर राज्य शासनाने नियुक्त केलेल्या सदस्यांच्या पदावधीइतका असेल. ".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.]**

**[पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई